नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १२/०५/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील मौजा कळमना शिवार येथे दिनांक २०/०४/२०२२ चे १६:०० वा. ते १६.१५ वा. सुमारास एम. एच—३१/ई.टी—४४८२ क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी नामे— जयकुमार उर्फ दशरथ नामदेव बोधाने वय ३२ वर्ष, रा.बेला त. उमरेड जि. नागपुर याने भारत रमेश उराडे (मृतक), वय ४६ वर्ष, रा. बेला यास मागे बसुन डबलसिट उमरेड कळमना मार्ग बेला येथे जात होता. त्यादरम्यान सायकाळी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन कळमना गावाचे टर्निंगवर मोटरसायकल गाडी स्लिप झाल्याने दोघे खाली पडले. या अपघातात आरोपी हा स्वतहा जखमी होवुन भारत रमेश उराडे याचे मरणास कारणीभुत ठरला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक मनोज वाघ यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १४८ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिनेश खोटले मो. क्र. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बोरी :— अंतर्गत वाकेश्वर येथे दिनांक ११/०५/२०२२ चे ०२.२९ वा. दरम्यान **रवींद्र ज्ञानेश्वर कांबळे (मृतक), वय ३८ वर्ष, रा. वाकेश्वर ता. जि. नागपुर** हा नेहमी दारू पिण्याच्या सवईचा असल्याने जास्त दारूचे सेवन करून उपाशि तापाशि असल्याने मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राजेंद्र ज्ञानेश्वर कांबळे वय ३४ वर्ष रा कारंजा ह.मु वाकेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सजंय खंडारे मो.नं. ९९२३१५९९५३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर